लेखक
डॉ.उमाकांत दांगट, IAS(Rtd)
माजी कृषी आयुक्त, पुणें

मानवी संस्कृतीच्या इतिहासात एकच संस्कृती चिरंतर व शाश्वत आहे, आणि ती म्हणजे कृषी संस्कृती होय. शेतीचा सर्वांगीण विकास म्हणजेच मानवाची भरभराट आणि समृद्ध संस्कृती असे म्हंटले तर वावगे ठरणार नाही. भारतीय उपखंडात कृषी संस्कृतीला हजारो वर्षांची उज्ज्वल परंपरा आहे. येथे शेती आणि पशुपालन एकमेकांना पुरक (supplementary) आणि परस्परावलंबी (interdependent) असल्याने ते, भारतीय संस्कृती या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. भारतीयांसाठी शेतीचे महात्म्य केवळ उदरनिर्वाहा पुरते मर्यादित नाही. येथील संपुर्ण जीवनपद्धत शेतीशी निगडित आणि पर्यावरणाभिमुख आहे. भारतीयांच्या दृष्टीने शेती जीवन जगण्याची कला (Art of Living), जीवन जगण्याचे शास्त्र (Science of Living) आणि जीवन जगण्याचे अध्यात्म (Spirituality of Living) आहे. म्हणूनच काल, आज, आणि उद्याही देशाला सर्व संकटातून तारूण नेण्याचे सामर्थ्य केवळ आणि केवळ शेतीमध्येच आहे.

भारतीय उपखंडाला निसर्गाचे अलौकिक वरदान लाभले असून येथील सूर्यप्रकाश, मृदा, पर्जन्यमान, ऋतू असे एकंदरीत पर्यावरण आणि लोकांची जीवनपद्धती शेतीला अनुकूल अशी आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने येथे कृषी संस्कृती रुजली व विकसित झाली. त्यामुळे भारतात एकेकाळी सोन्याचा धूर निघत होता किंवा भारतास "सोने की चिडियाँ" (Golden bird) असे संबोधण्याचा प्रघात पडला असावा.

भारत समृद्धीच्या शिखरावर असताना जगातील इतर देशातील लोक अर्धवट रानटी अवस्थेत जगत किंवा टोळ्या करून भटकत असत. अशा टोळ्या भारतात येेऊन निरपराध लोकांवर हल्ले करून येथील संपत्तीची लूट करून परत जात असत. कांही टोळ्या तर कायमस्वरूपी येथेच राहून आपल्या संस्कृतीशी एकरूप झाल्या. पुढे, भारतातील समृद्धी आणि मसाल्यांच्या पदार्थांच्या आकर्षणामुळे डच, पोर्तुगीज, इंग्रज व फ्रेंच यांनी व्यापाराच्या निमित्ताने समुद्र मार्गे भारतात प्रवेश करून विविध ठिकाणी आपल्या वसाहती स्थापन केल्या. इंग्रजांच्या ईस्ट इंडिया कंपनीने भारतात आपली पाळेमुळे घट्ट केली, त्या सुमारास इ. स.1700 मध्ये जागतिक उत्पन्नात भारताचा वाटा सर्वांत जास्त 22.6 टक्के इतका, म्हणजेे युरोप खंडातील सर्व देशांचे एकत्रित उत्पन्न 23.3 टक्क्यांशी तुल्यबळ असा होता. आर्थिक व सांस्कृतिकदृष्ट्या संपन्न, परंतु आधुनिक युद्धनिति आणि व्यापारी मुत्सद्देगिरी या बाबतीत मागे असलेल्या भारतीय जनतेच्या अज्ञानाचा गैरफायदा घेऊन परकीय वसाहती आणि विशेषतः 1858 मध्यें स्थापन झालेल्या ब्रिटिश साम्राज्याने भारतातील वनसंपदा, शेती आणि शेतकरी यांचे प्रचंड शोषण केले आणि येथील संपत्ती त्यांच्या देशात घेऊन गेले. त्याचा परिणाम असा झाला की, भारतातील बहुसंख्य जनता अज्ञान व दारिद्र्यात खिचपत पडली होती. आपल्या स्वातंत्र्यानंतर इंग्रज भारत सोडून मायदेशी गेले, त्यावेळी भारताचा जागतिक उत्पन्नातील हिस्सा 3.8 टक्के पर्यंत निच्चांकी घसरला होता, आणि एकेकाळी ब्रिटिश साम्राज्याच्या मुकुटात तेजस्वी हिरा म्हणून चमकणा-या भारतातील जनतेचे दरडोई उत्पन्न जगात सर्वात कमी झाले होते.

15 ऑगस्ट, 1947 रोजी इंग्रज साम्राज्याचा अस्त होऊन भारतात स्वातंत्र्याची पहाट उजाडली आणि एका नव्या युगाचा प्रारंभ झाला. आम्ही भारतीय लोकांनी ( We, the People of India ) आपल्या देशास सार्वभौम, लोकशाही, गणराज्य म्हणून घोषित करून भारताचे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित केले ; 26 जानेवारी, 1950 रोजी भारत खऱ्या अर्थाने लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून उदयास आले आणि भारतीय संविधानावर अधारित कायद्याचे राज्याचा (Rule of Law) अंमल देशात सुरू झाला. परंतु, स्वातंत्र्यप्राप्तीने आनंंदी झालेल्या आणि नव्या आशाआकांक्षांनी प्रफुल्लित जनतेस

खाण्यासाठी पुरेसे अन्न देखील नव्हते. संपूर्ण जग भारताकडे एक भुकेला देश (Hungry nation) म्हणून पाहत होता. परदेशातून मिळणाऱ्या निकृष्ट दर्जाच्या अन्नधान्याची आयात करून देशातील जनतेची भुक भागवण्याशिवाय पर्याय नव्हता. अशा या भुकेल्या देशातील लोकशाही किती दिवस टिकेल, अशी शंका जागतिक तज्ज्ञ व्यक्त करीत होते. सुदैवाने, देशाचे नेतृत्व प्रगल्भ विचारवंत व स्वातंत्र्यासाठी सर्वस्व अर्पण केलेल्या आणि नवराष्ट्र निर्मितीच्या ध्येयाने प्रेरित दूरदृष्टीच्या स्वातंत्र्यसेनानींकडे होते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात नियोजनबद्ध विकासाला सुरुवात झाली आणि विकास प्रक्रियेत कृषी क्षेत्राला अग्रक्रम मिळाला. विविध राज्यात भूसुधार कायद्यांची अंमलबजावणी सुरू झाली. सिंचन सुविधांची निर्मिती तसेच मृद व जलसंधारणाची कामे हाती घेण्यात आली. भारतीय कृषी अनुसंधान परिषद स्थापन करून संशोधन केंद्रे आणि कृषी विद्यापीठांचे जाळे देशभर निर्माण करण्यात आले. कृषी संशोधनातून विकसित करण्यात आलेले आधुनिक तंत्रज्ञान व अधिक उत्पादन देणारे पिकांचे वाण तसेच रासायनिक खते व कीटकनाशके यांच्या वापरास आणि शासनाच्या "अधिक धान्य पिकवा" मोहीमेस देशाप्रेमाने प्रेरित, मेहनती व प्रामाणिक शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पाहता पाहता देशात हरितक्रांति तसेच श्वेतक्रांति यशस्वी झाली. भुकेला देश ते अन्नधान्यात स्वयंपूर्णता, अन्नसुरक्षा ते अतिरिक्त कृषी उत्पादन, सर्व प्रकारच्या कृषी उत्पादनात क्रांति आणि आता कृषी क्षेत्रात जागतिक महासत्ता होण्याची आकांक्षा, हा कृषी क्षेत्रातील प्रगतीचा वाढता आलेख खूप मनोरंजक व उत्साहवर्धक
आहे. तथापि, या विकास प्रक्रियेतून शेती व्यवसायावर झालेले दुष्परिणाम (side-effects) गंभीर स्वरूपाचे असल्याने त्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. देशाची अन्न सुरक्षा अबाधित ठेऊन सुखशांती प्रस्थापित करण्यासाठी कृषी क्षेत्रात नव्याने निर्माण झालेल्या समस्यांकडे डोळसपणे पाहून वेळीच परिणामकारक उपाय योजना करावी लागेल.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कृषी क्षेत्रात झालेले परिवर्तन आणि उत्पादन वाढ नेत्रदीपक आहे. मागील सात शतकात आपल्या देशाची लोकसंख्या सुमारे चार पट वाढली तर अन्नधान्य (तृणधान्य, कडधान्य आणि तेलबिया) यांचे उत्पादन सहापट वाढले आहे. भाजीपाला व फलोत्पादनातील वाढ बारापट आहे. आपल्या दररोजच्या आहारात आवश्यक झालेल्या आणि म्हणून " ऑपरेशन ग्रीन " मध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या टोमॅटो, कांदा आणि बटाटे (Operation Green: TOP - Tomatoes, Onions and Potatoes ) यांचे उत्पादनात तर पंचवीस पट वाढ झाली आहे. दुधाचे उत्पादन देखील दहा पटीने वाढले आहे. पशुजन्य आणि मत्स्य उत्पादनात लक्षणीय वाढीची नोंद झाली आहे. भारतातील अनुकूल कृषी हवामान व जैवविविधता यामुळे जगात वेगवेगळ्या देशात होणारे सर्व प्रकारचे कृषी उत्पादन आपल्या देशाच्या कोणत्या ना कोणत्यातरी भागात निश्चितपणे होत असते. कापूस आणि सर्व महत्त्वाच्या कृषी उत्पादनात भारत देश पहिल्या किंवा दुसऱ्या क्रमांकावर आहे. असे असूनही देशातील बहुसंख्य शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती व त्यांच्यात निर्माण झालेली नैराश्याची भावना चिंताजनक आहे. याबाबत सर्व स्तरांवर वेळीच चिंतन होऊन शेतकऱ्यांना आर्थिक आरिष्टातून बाहेर काढण्यासाठी प्रचलित कृषी धोरणात आमूलाग्र बदल करणे क्रमप्राप्त आहे.

सन 1951 ते 1991 या चार दशकांचा कालखंड कृषी विकासाच्या दृष्टीने समाधानकारक होता, असे म्हणता येईल. या कालावधीत देशात अनेक राजकीय आणि सामाजिक उलथापालथी झाल्या. आपली अर्थव्यवस्था तीन ते साडेतीन टक्के अशा वार्षिक विकास दाराने विकसित होत होती. त्यास हिंदु विकास दर (Hindu Rate of Growth) म्हणत असत. त्यावेळी " उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी " अशी स्थिती होती. उद्योग, व्यवसाय, व्यापार आणि निर्यात यावर शासनाचे अनेक प्रकारची नियंत्रणे, निर्बंध व परवाना पद्धत असल्याने अर्थव्यवस्था कुंठीत झाली होती तसेच परकीय गंगाजळी मोठ्या प्रमाणात घटली

होती. परिणामी, आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली आर्थिक पत कमी झाली होती. त्यावर उपाययोजना आखून अर्थव्यवस्थेस चालना देण्यासाठी सन 1991 मध्ये शासनाने नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केला आणि उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण ( Liberalisation, Privatisation and Globalization) या तत्त्वांचा अवलंब करण्याचा निर्णय घेतला. नवीन आर्थिक धोरणाची अंमलबजावणी करून शासनाने उद्योग, व्यवसाय, व्यापार, आयात - निर्यात व सेवा क्षेत्रातील अनेक नियंत्रणे, निर्बंध मागे घेऊन मोठ्या प्रमाणात परवानामुक्त केले. परंतु, कृषी क्षेत्रावरील नियंत्रणे कायम ठेवली आणि कांही अतिरिक्त निर्बंधही लादले. शासनाच्या नवीन आर्थिक धोरणामुळे उद्योग आणि सेवा क्षेत्राला फार मोठी चालना मिळाली. देशाच्या विकास दरात टप्प्याटप्प्याने वृद्धी होत वार्षिक विकास दर आठ ते साडेआठ टक्के पर्यंत पोहोंचला. माहिती तंत्रज्ञानातील क्रांतिमुळे सेवा क्षेत्रातील विकास दर दहा टक्क्यांच्याही पुढे गेला आणि जगात सर्वात जास्त गतीने विकसित होणारी अर्थव्यवस्था (Fastest growing economy) असा आपणास गौरव प्राप्त झाला. परंतु, अर्थव्यवस्थेचा पाया असलेल्या कृषी क्षेत्रावरील नियंत्रणे कायम ठेवण्याच्या शासकीय धोरणांमुळे जागतिकीकरणाच्या आणि मुक्त अर्थव्यवस्थेच्या लाभापासून कृषी क्षेत्र वंचित राहिले. कृषी क्षेत्राचे चार टक्के वार्षिक विकास दराचे उद्दिष्टही आपण साध्य करू शकलो नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.

जागतिक हवामान बदलामुळे शेतक-यांना दुष्काळ, अतिवृष्टी, पूर, चक्रीवादळ अशा नैसर्गिक आपत्तींना सामोरे जावे लागत आहे. सर्व पिकांचा वाढलेला उत्पादन खर्च, अपुरा पतपुरवठा आणि शेती व्यवसायातील सर्व प्रतिकूल परिस्थितींचा सामना करून महत्प्रयासाने उत्पादित केलेल्या मालास योग्य भाव न मिळाल्याने नफ्याची गोष्ट सोडाच पण सन्मानपूर्वक उदरनिर्वाह करणेही शेतकऱ्यांना अवघड होत चालले आहे. परिणामी, कृषी क्षेत्रावर निराशेचे वातावरण पसरले आहे. आता "उत्तम नोकरी, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ शेती" अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे खेड्यातून शहरांकडे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर होत असून ग्रामीण व शहरी उत्पन्नातील दरी दिवसेंदिवस वाढत आहे. सन 2000 पासून वाढलेले शेतकरी आत्महत्याचे सत्र अद्यापही थांबलेले नाही.

आज शेतकरी वर्गात निर्माण झालेले नैराश्य आणि कृषी क्षेत्रातील मूलभूत समस्यांचा मागोवा घेतल्यास असे दिसून येते की, शेती व शेतकऱ्यांच्या शोषणाची स्वातंत्र्यपूर्व काळापासूनची व्यवस्था वेगवेगळ्या स्वरूपात आजही अस्तित्वात आहे. आपल्या देशात संविधान लागू झाल्यावर लगेचच सन 1951 मध्ये पहिली घटनादुरुस्ती होऊन भारताचे संविधानात नववे परिशिष्ट समाविष्ट करण्यात आले आणि या परिशिष्टात नमूद केलेल्या कायद्यांना न्यायालयात आव्हान देता येणार नाही, अशी तरतूद करण्यात आली. अशा प्रकारे, नागरिकांना आपल्या मूलभूत हक्कांसाठी मा. सर्वोच्च न्यायालयात न्याय मागण्याचा अधिकारावर (Right to legal remedy) निर्बंध आल्यामुळे शेतजमीन कमाल धारणा कायदा, आवश्यक वस्तू कायदा, भूमि अधिग्रहण कायदा यासारखे शेतकऱ्यांच्या मूलभूत स्वातंत्र्यावर मर्यादा आणणारे कायदे आजही अस्तित्वात आहेत, ही शेतकऱ्यांची मोठी शोकांतिका आहे.

आपल्या देशातील कृषी उत्पादनातील वाढ लोकसंख्या वाढीच्या तुलनेत तसेच आपल्या देशातील बहुसंख्य जनतेच्या क्रयशक्ती (Purchasing power) पेक्षा अधिक असल्यामुळे शेती उत्पादन अतिरिक्त ठरू लागले आहे. शेतमाल साठवणुकीसाठी देशातील गोदामे कमी पडू लागली आहेत. शेतक-यांच्या अधिक उत्पादन घेण्याच्या हव्यासापोटी जमिनीचे आरोग्य व पर्यावरण धोक्यात आले आहे. शेतकऱ्यांचा वाढता उत्पादन खर्च व आंतरराष्ट्रीय बाजारात कृषी उत्पादनाचे पडलेले दर या चक्रव्युवात शेतकरी अडकल्याने शेतीचे अर्थकारण धोक्यात आले आहे. शेतकऱ्यांच्या शाश्वत उत्पादन वाढीसाठी देशांतर्गत शेतकरी ते ग्राहक अशी मूल्यवर्धित साखळी निर्माण करणे, अतिरिक्त कृषी उत्पादनाचा

वैविध्यपूर्ण वापर आणि निर्यातीला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. त्यासाठी केंद्रीय स्तरावर कृषी उत्पादन, प्रक्रिया उद्योग, बाजार व्यवस्था आणि निर्यात विषयक दीर्घकालीन व सर्वंकष कृषी धोरणांची आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी " राष्ट्रीय कृषी व शेतकरी कल्याण आयोग" ( National Commission for Agriculture and Farmers' Welfare ) स्थापन होणे ही काळाची गरज आहे.

वस्तुतः, कृषीशास्त्र हा अत्यंत गुंतागुंतीचा आणि आंतरशाखीय अभ्यासाचा (Complex and Interdisciplinary Studies) विषय आहे. आपल्या देशातील वैविध्यपूर्ण कृषी हवामानामुळे उष्ण कटिबंधातील खजूर, डाळिंबापासून थंड प्रदेशातील सफरचंद, चेरी, बेरी पर्यंतची फळपिके, विविध मसाल्यांचे पदार्थ, भाजीपाला आणि सर्व प्रकारच्या अन्नधान्याचे उत्पादन, उत्पादकता व गुणवत्ता वाढविण्यास आणि जागतिक बाजारपेठ काबीज करण्यास खूप मोठा वाव आहे. आपण नवीन आर्थिक धोरण स्वीकारल्यानंतर कृषि संशोधन व विकास क्षेत्रात बहुराष्ट्रीय कंपन्यांनी शिरकाव करून बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके, संजीवके या कृषी निविष्ठांचे उत्पादन व पुरवठा क्षेत्र काबीज करून त्यांच्या किमतीत भरमसाठ वाढ केली आणि परिणामी शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च वाढलेला आहे. अशा परिस्थितीत शासनाने सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांमार्फत संशोधनावर अधिक भर देण्याची आवश्यकता अधोरेखित होते. विकसनशील देशांनी शाश्वत कृषी विकास व अन्नसुरक्षेसाठी त्यांच्या राष्ट्रीय कृषी उत्पन्नाच्या किमान एक टक्के रक्कम कृषी संशोधन व विकासासाठी खर्च केली पाहिजे अशी, या क्षेत्रातील तज्ज्ञांची शिफारस आहे. आपल्या केंद्रीय अर्थसंकल्पात ही तरतूद केवळ 0. 37 % एवढी तुटपुंजी आहे. राज्य शासनाची अर्थसंकल्पीय तरतूद तर नगण्य आहे. पर्यावरणशास्त्रा पासून मृद व कृषी रसायनशास्त्रापर्यंत आणि माहिती तंत्रज्ञानापासून जैवतंत्रज्ञाना पर्यंत तसेच स्थानिक बाजार व्यवस्थेपासून निर्यातीपर्यंतचे वैश्विक ज्ञानाचे दरवाजे नवीन पिढीतील शेतक-यांना उपलब्ध देेणे, आपली सामुहिक जवाबदारी आहे. आपल्या देशातील कृषी हवामानाला पोषक संशोधन होऊन आधुनिक तंत्रज्ञान वापरण्यायोग्य व किफायतशीर दरात शेतकऱ्यांना उपलब्ध झाल्यास तरुणाई शेतीकडे आकर्षित होईल. त्यासाठी भारतीय कृषी अनुसंधान परिषद आणि कृषी विद्यापीठे यांना पुरेसे मनुष्यबळ व आर्थिक तरतूद उपलब्ध करून त्यांचे बळकटीकरण करावे लागेल.

कोविड -19 च्या पार्श्वभूमीवर अचानक उद्भवलेल्या संकटाची आणि आनुषंगिक परिवर्तनाची नोंद जागतिक इतिहासात झाल्याशिवाय राहणार नाही. जगात सर्वात जास्त वेगाने विकसित होत असलेल्या भारताचा सन 2019 - 2020 मधील वार्षिक विकास दर (+ 8 ) टक्क्या वरून सन 2020 - 21 मध्ये ( -10 ) टक्क्या पर्यंत खाली घसरेल, अशी संभावना आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने वर्तवली आहे. महामारीच्या अत्यंत बिकट अशा कालावधीत फक्त कृषी क्षेत्रानेच जनतेला दिलासा दिला. " प्रत्येक गोष्ट थांबू शकते, परंतु शेती नाही. " ( Everything else can wait but , not Agriculture) याची प्रचिती देशवासीयांना पुन्हा आली. आपल्या देशातील अन्नधान्याची कोठारे भरलेली असल्यामुळे शेतकऱ्यांच्या भरोस्यावर सवलतीच्या दराने धान्य वाटप करून सर्वांना अन्न सुरक्षा प्रदान करणे शक्य झाले. आपल्या देशातील शेतकऱ्यांनी हरितक्रांति यशस्वी केली नसती तर महामारीच्या काळात देशासमोर काय परिस्थिती उद्भवली असती, याची कल्पना करवत नाही.

कोविड-19 च्या टाळेबंदीमुळे अचानक ठप्प झालेल्या अर्थव्यवस्थेचे चक्र गतिमान करण्यास आणि शेतीवर आधारित उद्योग तसेच व्यापार यांना चालना देण्यासाठी देशातील शेतकरी व व्यापाऱ्यांना खरेदी-विक्रीचे स्वातंत्र्य देण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारने जून, 2020 मध्ये तीन वटहुकूम जारी केले आणि संसदेने मंजूर झाल्यानंतर आता त्यांचे कायद्यात रूपांतर झाले आहे. या कायद्याच्या संदर्भात देशभर चालू असलेली चर्चा शेतकऱ्यांच्या अर्थकारणा ऐवजी इतरत्र वळण घेत आहे, असे दिसते.

शेतीविषयक तीन नविन कायदे पारीत करण्यासंदर्भातील शासनाचा निर्णय " खूप उशिरा आणि खूप थोडे " ( Too late and Too little ) अशा स्वरूपाचे असला तरी " देर आये, दुरुस्त आये " असे समजून त्याचे स्वागत केले पाहिजे. आवश्यक वस्तू (सुधारणा) अधिनियम, 2020 मधील नवीन तरतुदीमुळे शेतीमाल विक्री व्यवस्थेवरील निर्बंध कमी होतील हे मान्य केले तरीही, असामान्य परिस्थितीत अनुसूचित वस्तुंचा साठा, पुरवठा व किंमत यावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार सरकारला असल्याने शेतकऱ्यांच्या डोक्यावरील टांगती तलवार कायम आहे. याचा अनुभव नुकतेच, केंद्र सरकारच्या कांद्याच्या साठवणूक क्षमतेवर मर्यादा घोषित करण्याच्या निर्णयाच्या निमित्ताने आला आहे. अन्नधान्याची टंचाई असलेल्या कालखंडात शेतमाल पुरवठा व वितरण यावर नियंत्रण ठेवण्यासाठी लागू करण्यात आलेला आवश्यक वस्तु कायदा, आज देशातील अतिरिक्त कृषी उत्पादनाच्या काळात पूर्णपणे कालबाह्य आहे. हा कायदा आजचे परिस्थितीत अवाजवी असून त्याचे औचित्य (Propriety), प्रसंगोचितता
( Relevence) आणि समर्पकता
(Justification) संपुष्टात आली असल्याने संसदेने हा कायदा संपूर्णपणे रद्दबातल करणे न्यायोचित होईल.
संसदेने नुकतेच पारित केलेले शेतकरी उत्पादन व्यापार व वाणिज्य (प्रोत्साहन व सुलभीकरण) अधिनियम, 2020 तसेच शेतकरी (सक्षमीकरण व संरक्षण) किंमतीची हमी व कृषी सेवा करार अधिनियम, 2020 2
हे दोन्ही कायदे शेतकरी आणि व्यापारी यांना शेतमाल खरेदी - विक्रीचे स्वातंत्र्य बहाल करणारे व शेतीकरारास प्रोत्साहन देणारे आहेत. या कायद्यामुळे कृषी क्षेत्रात कांही प्रमाणात व्यापारी गुंतवणुकीस ( Corporate investment) चालना मिळेल अशी अपेक्षा आहे. तथापि, या दोन्ही कायद्यांना कांही राज्य सरकारांकडून विरोध होत आहे. केंद्र शासनाने निर्धारित केलेल्या शेतीमालाच्या किमान समर्थन मूल्यापेक्षा कमी दराने खरेदी - विक्री करता येणार नाही, अशा आशयाची सुधारणा समाविष्ट झाल्यास या कायद्यांच्या अंमलबजावणीस आक्षेप राहणार नाहीत.

वस्तुतः, भारतातील शेती आणि शेतकऱ्यांना शासनाच्या किंवा इतर कोणाच्याही मेहरबानीची आवश्यकता नाही. निसर्गाचे वरदान आणि भारतीय संविधानाने दिलेले मुलभूत अधिकार व स्वातंत्र्य शेतकऱ्यांची समृद्धी, गतवैभव आणि प्रतिष्ठा पुनर्स्थापित करण्यास पुरेशी आहेत. कृषी, उद्योग आणि सेवा या अर्थव्यवस्थेचा तिन्ही घटकांना समान न्याय देऊन स्पर्धात्मक व सर्वसमावेशक विकासासाठी पोषक वातावरण तयार झाल्यास भारतीयांचे जागतिक महासत्तेचे स्वप्न साकार होण्यास वेळ लागणार नाही आणि भारताच्या कृषी सामर्थ्याची प्रचिती पुन्हा संपूर्ण जगास येईल. व्यवसाय सुलभता ( Ease of doing Business) प्रमाणे शेती सुलभता ( Ease of doing Agriculture) ही संकल्पना अंमलात आणण्यासाठी आता निती आयोगाने पुढाकार घ्यावा आणि संपूर्ण अर्थव्यवस्थेस नवसंजीवनी द्यावी, अशी अपेक्षा आहे.

सर्व प्रकारच्या अस्मानी - सुलतानी संकटाचा सामना करून एकविसाव्या शतकात 2050 सालापर्यंत जागतिक महासत्ता होण्याची फार मोठी संधी आणि तशी क्षमता आपल्या देशात आहे. त्यासाठी देशवासियांनी आणि विशेषतः शेतकऱ्यांच्या तरुण व शिक्षित मुलांनी शेतीकडे पाहण्याचा दृष्टिकोन (Attitude) बदलला पाहिजे. शेतक-यांची मुले कोणत्याही क्षेत्रात पदार्पण करून यशस्वी होऊ शकतात, असा सार्वत्रिक अनुभव आहे. इतरांनी शेतामध्ये नव्याने प्रवेश करून यशस्वी होणे ' मोठे दिव्य आहे. कारण , शेतीचे अंगभूत ज्ञान ( Inherent Knowledge) आणि त्यासाठी लागणारी चिकाटी ( Patience and Perseverance) इतरांमध्ये क्वचितच आढळून येते. कृषी क्षेत्रात उत्पादन, प्रक्रिया उद्योग, मूल्यवर्धन , साठवणूक, देशांतर्गत बाजार व्यवस्थापन , परदेशी निर्यात , कृषी सेवा अशा नानाविध रोजगाराच्या व

व्यवसायाच्या संधी उपलब्ध आहेत. परंतु, " तुझे आहे तुजपाशी, परी जागा चुकलाशी " अशी खेड्यातील तरुणाईची अवस्था झालेली आहे.

तरूण पिढीने वैश्विक विचार आणि स्थानिक कृती (Think Global and Act Local) या तत्त्वाचा अवलंब करून शेतमाल उत्पादन , प्रक्रिया उद्योग आणि कृषी व्यवसाय या सर्व क्षेत्रात मुक्त संचार करण्याची मानसिकता तयार करून त्यानुषंगाने क्षमता बांधणी केली पाहिजे. मंत्र, तंत्र, यंत्र, कौशल्य आणि व्यवस्थापन ( Knowledge, Technology, Mechanisation, Skill and Management ) या पंचसूत्रीचा अंगीकार करून ज्ञानाधिष्ठित व श्रमाधिष्ठित अशा विवेकनिष्ठ सर्वंकष शेतीकडे मार्गक्रमण करणे , क्रमप्राप्त आहे.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींनी ज्ञानेश्वराच्या चौथ्या अध्यायात सांगितल्याप्रमाणे आपल्या बुद्धीवर जमा झालेली काजळी दूर करून ज्ञानदीप उजळून कृषी क्षेत्रात निरंतर दिवाळी साजरी करूयात.

मी अविवेकाची काजळी l
फेडूनी विवेकदीप उजळीं
तैं योगिया पाहे दिवाळी I निरंतर II